असा. क्र. ६२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६–०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

शुक्रवार, मार्च २३, २००७/ चैत्र २, शके १९२९

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ मार्च २००७

**आदेश**

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००७/६५७/प्र.क्र.८७/म-१.—मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) याच्या कलम ९ च्या खंड (क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, लोकहितास्तव पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असल्याबद्दल, महाराष्ट्र शासनाची खात्री पटली असल्याने, ते याद्वारे, विशेष आर्थिक क्षेत्राचे विकासक किंवा सह-विकासक आणि जमीन मालक यांच्यामध्ये निष्पादित केलेल्या जमीन संपादनाच्या पहिल्या अभिहस्तांतरण संलेखावर, आणि विकासक किंवा सह-विकासक आणि त्यातील युनिटे यांच्यामधील जमीन हस्तांतरणाच्या पहिल्या व्यवहारावर, उक्त अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूची एक मधील अनुच्छेद २५ च्या खंड (ख)



[ **किंमत :** रुपये ३.०० ]

अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क भारत सरकारच्या विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियमातील कलम ३ च्या पोट-कलम (१०) अन्वये विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यास दिलेल्या मंजुरीच्या दिनांकापासून १० वर्षांच्या कालावधीकरिता पूर्णतः माफ करीत आहे. विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ (२००५ चा २८) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१०) अन्वये विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मान्यता प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतरच फक्त, विकासक किंवा सह-विकासक याच्याकरिता, आणि उक्त अधिनियमाच्या कलम १५ अन्वये मान्यता देण्यात आल्यानंतरच फक्त त्या युनिटांकरिता, मुद्रांक शुल्क संबंधातील माफी उपलब्ध असेल.

**स्पष्टीकरण एक.**—उक्त माफीच्या प्रयोजनार्थ, " सह-विकासक ", " विकासक ", " विशेष आर्थिक क्षेत्र ", आणि " युनिटे " यांना विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ (२००५ चा २८) याच्या कलम २ च्या खंड (च), (छ), (यक) व (यग) यांमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच, अर्थ असतील.

**स्पष्टीकरण दोन.**—जर विकासक किंवा सह-विकासक विहित मुदतीत, नोंदणी अधिकाऱ्याला, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ याच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) खालील अंतिम अधिसूचनेची प्रत सादर करण्यात कसूर करील तर, वरील माफी रद्द समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण तीन.**—विकासक किंवा सह-विकासक मान्यतापत्रात नमूद केलेल्या करारनिविष्ट कालावधीत उक्त जमीन विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून अधिसूचीत करवून घेण्यात कसूर करील तर त्यानंतर सदर माफी लागू असणार नाही व विकासक किंवा सह-विकासक मुद्रांक शुल्क भरण्यास पात्र ठरतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. रा. माळी,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 23rd March 2007

### Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. Mudrank. 2007/657/CR-87/M-1.—In exercise of the powers conferred by clause *(a)* of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), the Government of Maharashtra being satisfied that, it is necessary so to do in the public interest, hereby remits the stamp duty, in the whole, chargeable under cluase *(b)* of article 25 of Schedule I appended to the said Act, on the instrument of first conveyance of acquisition of the land executed between the Developer or Co-Developer of the Special Economic Zone and the land owner, and the first transaction of transfer of land between the Developer or Co-Developer and the Units therein, for a period of 10 years from the date of permission granted to develop the Special Economic Zone by the Government of India under sub-section *(10)* of section 3 of the Special Economic Zones Act, 2005 (28 of 2005). The remission in respect of the Stamp Duty shall be available to the Developer or Co-Developer only after the letter of approval to establish a Special Economic Zone has been granted under sub-section *(10)* of section 3 of the Special Economic Zones Act, 2005 (28 of 2005) and to the Units only after the grant of approval under section 15 of the said Act.

*Explanation 1.*—For the purpose of this remission, the expression " Co-Developer ", " Developer ", " Special Economic Zone " and " Unit " shall have meaning respectively assigned to them in clauses *(f)*, *(g)*, *(za)* and *(zc)* of section 2 of Special Economic Zones Act, 2005 (28 of 2005).

*Explanation II.*—The above remission shall stand revoked if the Developer and Co-Developer fail to submit copy of final notification under sub-section *(1)* of section 4 of the Special Economic Zones Act, 2005, to the registering officer within prescribed time.

*Explanation III.*—In case the Developer or Co-Developer fails to have the said land notified as a Special Economic Zone within a stipulated period mentioned in the letter of the approval, the remission would no longer be applicable and the Developer or Co-Developer shall be liable to pay the Stamp Duty.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. R. MALI,
Joint Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई